ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 1 | October - 2016

Review Of Research

# लैंगिक शिक्षण व शिक्षकाची भूमिका

डॉ. उज्ज्वला दा. लोणकर
प्राचार्य , शारदाबाई पवार महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शारदानगर.तालुका: बारामती. जिल्हा : पुणे.




प्रस्तावना :

जागकिकरणाच्या काळात प्रत्येक माहिती इंटरनेटवरून मिळत आहे.लैंगिकतेबद्दल जाणून घेण्यास तरूण उत्सुक असतात. त्यातुन लैंगिक उत्तेजना होते व गुन्हे घडण्यासाठी चालना मिळते. केवळ योग्य ज्ञानाचा अभाव ही अशा गंभीर परिस्थितीस कारणभूत ठरतो. यासाठी लैंगिक शिक्षणाचा शालेय शिक्षणात अंतर्भाव करण्याच्या सुचना भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाने शालेय शिक्षण विभागाला दिल्या. सामाजिक माध्यमे,चित्रवाणी, नियतकालीके,इंटरनेट यांसारखी माध्यमे विद्यार्थ्यांच्या हाती आली आहेत त्याचा उपयोग विकृतपणे होऊ शकतो. विशिष्ट वयात मुलांना लैंगिकतेसंबंधी शास्त्रशुध्द माहिती देणे आवश्यक आहे.

किशोरावस्था हा काळ बालपण आणि तारूण्य यांना जोडणारा काळ असतो. या अवस्थेत श्शरीरातंर्तग व शरीरबाहय अवयावांची वाढ झापाटयाने होत असते.याच अवस्थेत किशोरांमध्ये लैंगिक बदल फार झापाटयाने होत असतात.या बदलांविषयी मनात संकोच,बावरलेपणा, उत्सुकता निर्माण होते.लैंगिक आकर्षण व भावनिक आंदोलने जाणवायला लागतात. किशोरावस्था व कौमार्यावस्था या 'वयात येणं' या मुलामुलींच्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा आहे.श्शाळेत दिल्या जाण—या लैंगिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना फायदाच होतो.त्यांना या लैंगिक प्रक्रियेविषयी माहिती मिळत जाते नी वाढत्या वयानुसार योग्य तो समंजसपणाही येत जातो.तसेच यात त्यांच्या भावनांचे जतन तर केले जातेच शिवाय त्याचे सामाजिक वर्तन कसे असावे याचेही ज्ञान मिळते.

विद्यार्थ्यांना लिंग ओळख व्हावी,त्याची लैंगिकता व वयानुरूप शरीरात होणारे बदल व त्याशी निगडीत समस्या याची जाण व्हावी,अनावश्यक लैंगिकसलगी करण्यापासून व अत्याचारापासून विद्याथ्र्याचा बचाव व्हावा यासाठी लैंगिक शिक्षण आवश्यक आहे. लैंगिक शिक्षणामुळे नाते संबंधाचे महत्व समजण्यास,लैंगिकवर्तन कसे असावे हे समजण्यास,पूनरूत्पादन प्रक्रिया कशी कार्य करते व त्यात लिंगाची भूमिका कोणती हे समजण्यास मदत होते. लैंगिक शिक्षणामुळे विद्यार्थ्याना शारीरिक,आपल्या परंपरेबाबत ,मानसिक व अध्यात्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शन केले जाते. यासर्व विषयाचे शिक्षण देत असताना विविध परंपरा,र्नतिकता व जाती—धर्माचा मान ठेऊन व त्यांचे महत्व जाणूनच या विषयाचे धडे दिले जातात.

शाळेच्या अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षणाचा समावेश केल्यास मुलांचे भविष्य उजळण्यास एका अर्थाने मदतच होत असते. कारण शालेय जीवनात मुलांनी घेतलेले कोणतेही निर्णय योग्य आहेत किंवा नाहीत तसेच त्यांनी उचललेले पाऊल सकारात्मक आहे की नकारात्मक याचे ज्ञान आपोआपच मुलांना मिळत असते. हे आजच्या पिढीतील यौवनावस्थेतील मुलांच्या जीवनासाठी महत्वाचे आहे.

लैंगिक शिक्षणात शाळेत प्राथमिक विभागात नातेसंबंध व कुटुंबाचे महत्व पटवून दिले जाते. तसेच या विभागात आपल्या शरीराची होणरी वाढ म्हणजेच यौवनावस्थेला सुरूवात होण्याअगोदरच दिलेल्या माहितीमुळे मुलांना त्यांचे आयुष्य योग्य प्रकारे जगण्यास मदत होणार असते. शाळा या शिक्षणाची सुरूवात करण्यासाठी क्षपालकांचीही उदत करू शकतात.

अधिक वय असलेली मुले आणि किशोरांना मानवी पुनरूत्पादन क्षमता, मानवी रचना,यौवनावस्था, व विषाणूंमुळे माणवाला कसा संसर्ग होऊ शकतो याचे ज्ञान मिळणे आवश्यक असते. असुरक्षित संभोगामुळे कोणते रोग होऊ उद्‌भवतात.एच.आय.व्ही./एड्स् ची लागण कशी होते व त्याबाबत आपण कोणत्या दक्षता घेतल्या पाहिजेत.निदान व उपचार याबाबत महत्वपूर्ण माहिती असणे हे त्यांच्यासाठी खुप गरजेचे आहे. त्यांच्या जीवनात व्यसन कशाप्रकारे घातक ठरू श्शकते.,याबाबत त्यांना जागरूक ठेवणेही तितकेच गरजेचे आहे.

लैंगिक शिक्षण देण्याची सर्वप्रथम पालकांची जबाबदारी असते व पालकांनंतर ही शिक्षकांची जबाबदारी असते. लैंगिक शिक्षण म्हणजे स्वत:च्या आणि भिन्न लिंगीय व्यक्तीच्या लिंगीकडे बघण्याचा श्शास्त्रीय आणि नैतिक दृष्टिकोन निर्माण करणे म्हणजेच लैंगिक शिक्षण होय.स्वत:च्या लिंगाकडे बघण्याचा दृष्टिकोन, दुस—या लिंगाविषयी आदर निर्माण करणे, ऐकमेकांच्या लैंगिक भूमिका याविषयी सकारात्मक कल तयार करणे. म्हणजे लैंगिक शिक्षण होय. लैंगिक शिक्षण ही संज्ञा कामजीवन, प्रजनन आणि गुप्तांगांबद्दल दिलेल्या माहितीसाठी वापरली जाते.लैंगिक शिक्षणात नुसती एखादी श्शरीराच्या भागाची माहिती करून देणे नाही,तर त्या अनुषंगाने होणा—या भावनिक बदलांशी जुळवून घ्यायला शिकविणे,भावनांच्या आंदोलनांना संयमित करायला शिकविणे या गोष्टीही येतात.

## लैंगिक शिक्षण :

### अ) कुटुंबजीवन शिक्षण :

१. किशोर व कौमार्य अवस्थेतील मुलामुलींना प्रजनन स्वास्थ्याबाबत शिक्षण देणे.
२. या वयागटातील मुले भविष्यातील माता—पिता हे लक्षात घेऊ त्याबाबतच्या जबाबदा—यांची जाणीव करून देणे.
३. जबाबदार लैंगिक वर्तनाबाबत प्रयत्नपूर्वक जाणीव निर्माण करणे.
४. व्यक्तीमत्व विकासासाठी मार्गदर्शन करणे.
५. ग्रंथी स्त्रावांमुळे होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक बदल याबाबतची जाणीव निर्माण करणे.

### ब) लोकसंख्या शिक्षण :

११ जुलै ला 'जागतिक लोकसंख्या इशारा दिन' पाळला जातो. ११ जुलै १९९७ रोजी येगोस्लाव्हीया येथे जन्मास बालक आले आणि जगाने लोकसंख्येची ५०० कोटीची सिमा ओलांडली. लोकसंख्या वाढीची कारणे म्हणजे अज्ञान, निरक्षरता,मुलगा जन्माचा हट्ट्,स्त्रियांच्या मानसिकतेचा विचार न होणे.बालविवाह, कुटुंब नियोजन साधनांविषयीचे अज्ञान, पुरूषप्रधान संस्कृती आदी कारणाने वाढ होत आहे.त्याचे दुष्परीणाम म्हणजे जैविक,आर्थिक,सामाजिक (शेती,अन्नधान्य,शिक्षण),आरोग्य इ.घटकांवर होतो. प्रतिवर्षी एक ऑस्टेलिया खंडाइतकी लोकसंख्या जन्मास येते. जागतिक समस्येची माहिती,जाणिव मुलांना लैंगिक शिक्षणाच्या माध्यमातून करून देणे आवश्यक आहे.

### क) व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन :

भिन्न लिंगी व्यक्तीविषयी वाटणारे आकर्षण, दिवास्वप्नामध्ये रममाण होण्याची भावनिक स्थिती, शारीरिक बदलांचा मानसिक स्तरावर उमटणारे पडसाद यातून निर्माण होणारी 'वादळ व तणावाची अवस्था'

, आदर्श व्यक्तींचा' शोध,संघप्रवृत्ती—मित्र परिवारांमध्ये एकरूप होण्याची वृत्ती आदी घटकांचा विचार करता घडणारे शारीरिक बदल व मानसिक पडसाद यांचा सहसंबंध शास्त्रीय दृष्टिकोनातून सांगणे. आवश्यक आहे. दिवा स्वप्नांना कृतीची जोड आवश्यक आहे.हे ही समजुन सांगावे. आदर्श व्यक्तीमत्वाचा शोध पालक,शिक्षक का असु नये? याचाही विचार व्हावा. संघ भावनेचा विचार होताना विधायक कार्यासाठीची भावना रूजवावी. 'वादळ व तणावाची अवस्था ' आहे. त्यामुळे समजाऊन घेणे सर्वात आवश्यक आहे.या कारणंसाठी लैंगिक शिक्षण द्यावे.

### ड) प्रजननसंस्थासंबंधी शास्त्रीय ज्ञान देणे :

पुरूषांमधील एक रेतपेशीय व स्त्री कोषतील एक अंडपेशी यांच्या संयोगातून मातेच्या गर्भाशयात एक फलित अंडपेशी तयार होऊन मानवी जन्मास प्रारंभ होतो. सर्वसामान्यपणे ९ महिने ९ दिवसानंतर मूल जन्मास येते. लिंग निश्चिती (मुलगा की मुलगी) हे सर्वस्वी पुरूष्वरच अवलंबून असते. मसिक पाळी म्हणजे निसर्गाने मुलीला आई बनण्याची दिलेली संधी. गर्भधारणा न झाल्यास स्त्राव होतो.सर्वसाधारणपणे २८ दिवसांच्या अंतराने मासिक पाळी येत असते.याकाळात वैयक्तिक स्वच्छता,योग्य आहार,विशेषत: पालेभाज्या यांचे सेवन करावे. सर्वात महत्वाचे म्हणजे नैतिकता,सामाजिक रूढी—नियम,आरोग्य यादृष्टिने जोखिमयुक्त व बेजबाबदार लैंगिक कृत्य यापासून परावृत्त करणे आवश्यक आहे.

### ड) लैंगिक आजारीसंबंधी मार्गदर्शन :

योग्यवेळी मुलामुलींना लैंगिकतेबद्दल योग्य ती माहिती दिल्यास त्यातूल उद्‌भवणारी आरोग्यविषयक चिंता दूर होण्यास मदत होईल. लैंगिक जोखिमयुक्त संबंधातून अनेक लैंगिक आजारांचा प्रसार व प्रादुर्भाव होत असतो.त्यातीलच जागतिक भेडसविणारी समस्या म्हणजे एच्.आय.व्हि., एडस्. असुरक्षित जोखिमयुक्त लैंगिक संबंध,दुषित सिरिंजचा वापर,एच्.आय.व्हि. बाधित मातेच्या पोटी जन्मास येणारे अपत्य, एच्.आय.व्हि. बाधित रक्त स्विकार या कारणातून या आजारांचा प्रसार होतो.

### उपक्रम :

कार्यक्रम राबविताना पुढील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

१. प्रत्येक मुलाचे वय,त्याचा समजुतदारपणा आणि त्याच्या विकासाची पातळी.
२. पालकाच्या साहयाने सुरूवात करणे.
३. पालकांना प्राधान्य घेण्यास प्रोत्साहन देणे.
४. पाल्यांबरोबर चर्चा.
५. आपल्या मुलाची शारीरिक अवस्था व त्यांची गरज लक्षात घेणे.

### पुढील विषयावर कार्यक्रम व्हावेत.

१. मुलामुलींना यौवनावस्थेसाठी तयार करणे.
२. मुलींना मासिक पाळी सुरू करण्या अगोदरच त्याविषयी माहिती पुरविणे.
३. गर्भ निराधक गोळयांचा वापर व त्यांचे फायदे—तोटे,मार्गदर्शन व विश्वासहार्थ सेवा.
४. गर्भपातामुळे होणारे परिणाम व अशावेळे डॉक्टरांशी कसा संपर्क साधावा.
५. .एच.आय.व्ही./एड्स् म्हणजे काय? ते कसे होऊ शकतात.
६. सुक्षित संभेगाची आवश्यकता का आहे.

### नातेसंबंध राखण्यासाठी व त्यांचे महत्व पटवून देण्यासाठी विषय :

१. चांगले सुदृढ नातेसंबंध प्रस्तापीत करणे.
२. नातेसंबंध कसे टिकवावेत.
३. ख—या आयुषतील नातेसंबंध कसे असावेत.
४. पालकांच्या भूमिका व जबाबदा—या शिकवाव्यात.

**समारोप :**

किशोरवयीन मुलांची मानाकिता समजाऊन घेणे आणि योग्य त्यावेळी शाळा,शिक्षक व पालक यांनी मुलांना शरीरशास्त्रीय माहीती देणे, मानसिक आधार देणे गरजेचे आहे.मुलं आयुष्याच्या नाजुक वळणावर असताना त्याच्या मनातील गुंता सोडवायला हवा आणि त्यांच मनही सममजून घ्यायला हवे. किशोरवयीन मुलांना शास्त्रशुध्द ज्ञारन दिल्यास,त्यांच्या वयातील शारीरिक वाढ व विकासाबाबत योग्य मार्गदर्शन केल्यास त्यांच्या लैंगिकतेबद्दच्या आणि या वयातील बदलांविषयीच्या शंका दूर होऊ मनातील गोंधळ दूर होईल.

**संदर्भ**

१.पाखमोडे, अपर्णा,(८ एप्रिल २००७)लैंगिक शिक्षण,'सकाळ',पुणे आवृत्ती,सप्तरंग,पृ.क्र.३
२.खाडीलकर,वामन,( ८ एप्रिल २००७) यौवनारंभ,'सकाळ' पुणे आवृती,सप्तरंग पृ.क्र.५
https://mr.m.wikipedia.org
https://www.bbc.com
https://www.aksharnama.com